कोकणचे पहिले दैनिक
रत्नभूमि

फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाऊं... ...कारातून १९ अंगणवाड्यांचे नूतनीकरण पूर्ण; गोळप आणि कोळंबे येथील दोन अंगणवाड्यांचे आज लोकार्पण

रत्नागिरी, ३० ऑक्टोबर २०२६: ग्रामीण भागातील बालकांना सुरक्षित, स्वच्छ, आनंददायी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पोषक वातावरण मिळावे, या उद्देशाने फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या (FIL) सीएसआर उपक्रमांतर्गत मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे रत्नागिरी जिल्ह्यात अंगणवाडी नूतनीकरणाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत एकूण १९ अंगणवाड्यांचे नूतनीकरण पूर्ण करण्यात आले असून, त्यापैकी आज रत्नागिरी तालुक्यातील गोळप-दाभिळवाडी आणि कोळंबे-बागवाडी येथील दोन नूतनीकरण केलेल्या अंगणवाड्यांचे लोकार्पण करण्यात आले.

फिनोलेक्स कंपनीच्या ४५ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीचे औचित्य साधून हाती घेण्यात आलेला हा उपक्रम मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त सौ. रितू प्रकाश छाब्रिया आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे एक्झिक्युटिव्ह चेअरमन श्री. प्रकाश प्रल्हाद छाब्रिया यांच्या दूरदृष्टीतून आणि मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाच्या तिसऱ्या टप्प्यांतर्गत गोळप-दाभिळवाडी आणि कोळंबे-बागवाडी येथील अंगणवाड्यांचे नूतनीकरण पूर्ण करण्यात आले आहे. या कामामध्ये आवश्यक बांधकाम दुरुस्ती, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, आकर्षक रंगकाम, बालकांना ज्ञानवर्धक माहिती देणाऱ्या बोलक्या भिंती तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्य आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे अंगणवाड्यांचा परिसर अधिक स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि बालमैत्रीपूर्ण झाला आहे.

बालकांच्या सर्वांगीण विकासामध्ये सुरुवातीच्या शिक्षणाला विशेष महत्त्व असते. अंगणवाडी ही बालकांच्या शिक्षणाची आणि सामाजिक जडणघडणीची पहिली पायरी आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून जुन्या आणि दुरुस्तीची आवश्यकता असलेल्या अंगणवाड्यांचे नूतनीकरण करून ग्रामीण भागातील



बालकांना शिक्षणासाठी अधिक अनुकूल वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. आकर्षक बोलक्या भिंती, सुधारित पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक साहित्यामुळे बालकांच्या बौद्धिक, शारीरिक, सामाजिक आणि भावनिक विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे.

या लोकार्पण कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी श्री. नरेंद्र गावंड, अंगणवाडी पर्यवेक्षिका सौ. सावंत, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे एचआरप्लांट हेड श्री. नामदेव देशमुख, श्री. सागर चिवटे (Factory Manager) आणि श्री. विकास कुरतडकर (सिव्हिल विभाग) उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास स्थानिक सरपंच, ग्रामपंचायत प्रतिनिधी, अंगणवाडी सेविका, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुकुल माधव फाऊंडेशनच्या उडठ विभागाचे श्री. शामराव निंबाळकर आणि श्री. वरद गोरे कार्यक्रमास उपस्थित होते.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील अंगणवाडी पायाभूत सुविधांना बळकटी मिळत असून, बालकांच्या प्रारंभिक शिक्षणाची अधिक दर्जेदार आणि बालस्नेही वातावरण ...ा दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जात आहे. स्थानिक ग्रामस्थ आणि पालकांनी या उपक्रमाचे स्वागत करून फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाऊंडेशनच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.